# स मा रो प

# समारोप

मध्ययुगीन मराठी वाङ्.मयातील संत, पंत व तंत कवींना महत्वाचे स्थान आहे. संतानी आपल्या ओवी व अभंगाद्वारे सर्वसामान्य लोकांच्यामध्ये परमेश्वरविषयक भक्ती वाढवलेली पाहावयास मिळते. पंतानी आपल्या आख्यान काव्याच्या आधारे रामायण, महाभारत, भागवत व पुराणे सोप्या भाषेत सर्वसामान्य लोकांच्यापुढे मांडलेले आहे. तंतकवी, किंवा शाहिरानी आपल्या पोवाडे व लावण्यांच्याद्वारे लोकांचे मनोरंजन केलेले आहे. या शाहिरी वाङ्.मयातील "शाहीर परशरामांच्या लावण्यांचा अभ्यास आपण संशोधन पध्दतीने केला आहे.

शाहिरी वाङ्.मयातील रामजोशी, होनाजीबाळा, सगनभाऊ व प्रभाकर यांच्यापेक्षा वेगळे व्यक्तिमत्व असणारे एक रत्न म्हणजे "शाहीर परशराम होय". परशराम म्हणजे संतत्व आणि शाहिरत्व असे द्विविध व्यक्तिमत्व असणारे कवी आहेत. संतकाव्याचा व पंडितीकाव्याचा परिणाम परशरामांच्या लावण्यावर झालेला आहे. त्याच्या आध्यात्मिक, पौराणिक, ईश्वर-वर्णनपर लावण्यामधून त्यानी आणलेली "आध्यात्मिकता" इतर शाहिराना जमली नाही. शाहीर परशरामाच्या लावण्यामधून आलेल्या विविधतेमूळे त्याच्या लावण्या महत्वपूर्ण ठरल्या आहेत.

शाहीर परशरामांची लावणी पेशवाईचा अस्त व इंग्रजी सत्तेचा उदय या काळातील आहे. या काळामध्ये समाजामध्ये घडणारे अनेक प्रसंग परशरामानी चित्रित केले आहेत. समाजातील विविध भावनाचे तांडवनृत्य आपल्या डोळ्यासमोर परशरामानी उभे केले आहे. त्या काळातील समाजाची वास्तवचित्रे त्याच्या लावणीत उमटलेली आहेत. समाजाच्या भाव, भावना, विचारकल्पना, सुख-दु:खे सणवार, वस्त्रअलंकार, नवससायास, प्रियकर-प्रेयसीचा

शृंगार पती-पत्नीचा शृंगार, पतीबद्दल तक्रार करणारी पत्नी, दोन बायका केल्यानंतर नव-याची होणारी फजिती, इत्यादी सामाजिक जीवनातील प्रसंग वास्तववादीरीतीने परशरामानी चित्रित केले आहेत.

शाहीर परशरामाच्या लावण्यांचा अभ्यास करताना त्यांच्या लावण्यातील विविधता आपल्याला दिसून येते. सर्वसामान्य लोकांना उपदेश व मनोरंजन करण्यासाठी त्यानी आपली काव्यरचना केली. त्याची लावणी रचनेची मुख्यप्रेरणा धार्मिक किंवा भक्तीने मुक्ती साधण्यासाठी आहे. हे परशरामाच्या लावण्यांचा अभ्यास केल्यानंतर समजते. त्यानी आपल्या लावण्यामधून आपल्या जीवनाची ओळख करुन दिली आहे. एका लावणीमध्ये त्यानी आपण अभंगाकडून लावणीकडे कसे वळलो याचे सुरेख चित्रण केले आहे. आपण वयाच्या तेरा, चौदा वर्षापासून अभंग रचना करीत होतो. पण गुरुच्या आशिर्वादाने किंवा गुरुच्या आज्ञेवरुन आपण लावणी करु लागलो असे "करीन लावणी अलक्षा वेचूनी" या लावणीत सांगतात,

"करीन लावणी अलक्षा वेचुन देवा पंढरीराया ।
अभेद गाणे नामे तुझिया गाइन मी तराया ।
दहिदुध प्यालो रास खेळलो नित्य हरिच्या छंदा ।
अति आवडता श्रीकृष्णाचा व्रजवासी मी पेंदा ।
खंत जाहली पुन्हा मनाला भेटावे गोविंदा ।
म्हणुनी झालो अभंग गाया नामयाचा गोंदा ।
जन्म दुसरा घेऊनि भजलो अखंड पंढरिराया ।"

शाहीर परशरामाची कळकळ ही त्याच्या विविध प्रकारच्या लावण्यावरुन दिसून येते. मराठी शाहिरी वाङ्मयातील इतर शाहीर मौजमज्जा करण्यासाठी आर्थिक हव्यासापोटी लावणीची रचना करीत होते. पण परशरामाची लावणी रचना ही भक्तीने मुक्ती साधण्यासाठी

केली आहे. दुसऱ्या बाजीरावाची स्वारी कोपरगावी असताना अनेक शाहीर, तमासगिर स्वारी बरोबर होते. त्यामध्ये होनाजीबाळा, सगनभाऊ, बापू डांग्या, मार्तंड असे अनेक जण होते. यावेळी परशराम तेथे हजर नव्हते. म्हणून त्र्यंबकजी डेंगळ्यांनी परशरामास बोलविण्यासाठी जासूद पाठविले व बोलावून घेतले. या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमात होनाजीबाळाने "गंगेवरील लावणीचे एक कडवे वाचले तर परशरामावर पाळी येताच त्याने स्वतःच नवीन रचलेल्या गंगेची लावणी""पश्चिमवाहिनी गोदा प्रतिकूल गंगा ही लावणी म्हटली. या लावणीतून बाजीराव पेशव्यांची व राघोबादादाची भरपूर स्तूती केली. बाजीराव खूष झाले. त्यानी परशरामाला एक हजार रुपये बक्षिस जाहिर केले. पण परशरामाने ते नाकारले व बाजीरावांना काव्यातून उत्तर दिले.

"पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा ।
महाल मोकासे जहरी कसे करितिल अपुला बंदा ।
रुची मनाची गायक करुनी अळवावे गोविंदा ।
धनी खातर आम्ही राया पडलो नाही या फंदा ।
कर्म आमुचे हरिगुण गावे नाम न विक्री परिका ।
सुई दोऱ्याला ख्यात असो द्या तोचि इनाम मोकासा ।"

पेशवाईत दिलेल्या देणग्या परशरामाने नाकारल्या होत्या. पुढे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाह चालवण्यासाठी इंदूर, ग्वाल्हेर, बडोदे अशा संस्थानिकांकडून देणग्या स्वीकारल्या आहेत. त्यामुळे शाहीर परशरामाना "लाचार" शाहीर म्हणतात. पण ही टीका शाहीर परशरामाच्या बाबतीत योग्य वाटत नाही. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इंग्रजी सत्ता भारतावर राज्य करु लागली. तेव्हा शाहिराना आपली कला विकून व सुद्द इंग्रजांचेच पोवाडे गाऊन पोट भरण्याची पाळी आली. या फेऱ्यात परशराम सापडला असावा. परशरामाचा पिढीजात धंदा शिंप्याचा होता. तो इंग्रजी सत्ता आल्यानंतर

नाहीसा झाला असावा. त्यामुळे त्याला आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी या देणग्या स्विकाराव्या लागल्या असतील. किंवा कोणत्याही कलावंताला त्यांची कला सादर केल्यानंतर त्या कलेचा आदर म्हणून त्याना देणग्या दिल्या असतील. त्या देणग्या आनंदित होऊन परशरामानी स्वीकारल्या असतील. या देणग्या स्वीकारल्या म्हणून त्याना लाचार शाहीर म्हणणे योग्य वाटत नाही.

शाहीर परशरामाच्या लावण्याचा अभ्यास करताना आपण लावणीच्या उदय, स्वरूप, प्रकार, त्याचबरोबर लावणीतेळचे ओझरते दर्शन, त्याच्या जीवनचरित्राची माहिती घेऊन त्याच्या विविध लावण्याचे सहा भागात वर्गीकरण करून त्यांच्या काव्याचे विशेष स्पष्ट केले आहेत. शाहीर परशरामाच्या लावणीमधून पेशवाईच्या काळातील अंधाधुंदीचा कारभार, ब्राम्हणाचे वर्चस्व, समाजातील रूढी, परंपरा, चालीरिती इत्यादी गोष्टीचे चित्रण परशरामानी आपल्या सामाजिक लावण्यामधून चित्रित केले आहेत.

शाहीर परशरामाचे शाहीरी वाङ्.मयामध्ये व्यक्ती व कवी म्हणून वेगळे दर्शन घडते. शाहीर परशराम इतर शाहिरांच्यापेक्षा वेगळा होता. त्याला संतत्व प्राप्त झाले असल्यामुळे तो व्यसनापासून अलिप्त होता. शाहिरी वाङ्.मयातील रामजोशी, होनाजीबाळा, प्रभाकर इत्यादी शाहिराना मद्याचे व बाईचे व्यसन होते. पण परशराम यापासून दूर होता. शाहीर परश-रामाचे चरित्रकार सांगतात, परशरामाला फक्त सुपारीचे व्यसन होते. त्यामुळे शाहिरी वाङ्.मयामध्ये व्यसनाधिनता नसलेला शाहीर म्हणून परशरामाकडे पाहतात. एक आगळी व्यक्ती म्हणून शाहिरी वाङ्.मयात प्रसिध्द आहेत.

इतर शाहीर आणि परशराम यांच्यामध्ये अनेक बाबतीत साम्य व विरोध आहे. विषयातील विविधता हा परशरामाच्या लावणीचा साम्य

महत्त्वाचा विशेष आहे. विषयाच्याबाबतीत त्यानी अनेक प्रकारची नवीनता आणलेली आहे. यामध्ये सवतीसवतीचा झगडा, भावाभावांचा झगडा, गंगा, गौरीचा झगडा इत्यादी संघर्षमय विषय निवडून लोकांच्या समोर मांडून त्यांचे मनोरंजन परशरामानी केले आहे. कथाकाव्यातून त्यानी पौराणिक कथा नाटयपूर्णरीत्या उभ्या केलेल्या आहेत. इतर शाहिरानी या सर्व गोष्टीचा वापर केला असला तरी संख्येच्या दृष्टीने व उत्कटतेच्या दृष्टीने, नाटयगुणाच्या दृष्टीने विविध रसाच्या दृष्टीने व विविध स्वभावचित्रणाच्या वापराने परशरामाच्या लावण्या महत्वपूर्ण ठरल्या आहेत. त्यानी केलेला उपदेश हा एखाद्या संतानी केलेला उपदेश मानुन लोक त्यांचे आचरण करीत होते. असे आगळे वेगळे व्यक्तिमत्व शाहिरी वाङ्मयामध्ये उदयास आले होते. त्याच्या विविधतेने वैशिष्टयपूर्ण ठरलेल्या लावण्याचा अभ्यास आपण केला आहे.

........